जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४७८ दिनांक - ३०/०६/२०२३**

येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## अपहरण करुन खून करण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीस अटक

दि. २९/०६/२०२३ रोजी रात्री येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलीस अंमलदार स्वप्नील मराठे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, खाऊ गल्ली येरवडा येथे दोन इसम मोटार सायकलला नंबर प्लेट नसुन संशयास्पद हालचाली करत आहेत.सदरची माहिती वरिष्ठांना कळवून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि अंकुश डोंबाळे, सर्व्हेलन्स अधिकारी पोउपनि रविंद्रकुमार वारंगुळे व स्टाफ यांनी तेथे जावून संशयीत इसमांना पळून जात असताना अतिशय शिताफीने पकडले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारता **निलेश अरुण कोंढवळे वय २७ रा पारनेर अहमदनगर** असे असल्याचे सांगितले.त्याचेकडे मोटार सायकलबाबत अधिक चौकशी करता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याचे अंगझडतीत एक लोखंडी हत्यार मिळुन आले आहे.

सदरबाबत येरवडा पोलीस स्टेशन येथे येरवडा पो स्टे गु र नं ४३४/२०२३ आर्म ॲक्ट ४(२५) मपोॲक ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करुन त्यास दि. २९/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीकडे अधिक तपास करता त्यांनी दि. २८/०६/२०२३ रोजी रात्री ११.०० वा चे सुमारास फिर्यादी हे पिंपरी येथून वाघोली येथे जात असताना आरोपीने हातात लोखंडी हत्यार घेवून फिर्यादी यांचेवर कट करुन हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे. म्हणून विमानतळ पो स्टे गु र नं ३२३/२०२३ भादवि ३४१ १२०(ब) ५०७ ५०६ ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४,श्री शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग,श्री संजय पाटील, वपोनि येरवडा, श्री बाळकृष्ण कदम, पो.निरीक्षक गुन्हे जयदिप गायकवाड, पोनि गुन्हे,पो स्टे येरवडा श्रीमती कांचन जाधव, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि अंकुश डोंबाळे, पोउपनि रविंद्रकुमार वारंगुळे, श्रेणी पोउपनि प्रदिप सुर्वे, पोलीस अंमलदार गणपत थिकोळे, दत्ता शिंदे, तुषार खराडे, किरण घुटे, अमजद शेख, सागर जगदाळे, कैलास डुकरे, प्रविण खाटमोडे, पोअं अनिल शिंदे, राहुल परदेशी, सुरज ओंबासे, दत्तात्रय शिंदे, प्रशांत कांबळे, अश्विन देठे, सुशांत भोसले, स्वप्निल मराठे, मोहन गिरमे, प्रविण माळी, तेजस पवार, अनिल अहिवळे यांनी केलेली आहे.